① क्र. १३०

रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०/९९

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, मे २४, १९९९/ज्येष्ठ ३, शके १९२१

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-ब

...ासनाने महाराष्ट्र अधिनियमांतर्गत तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि ... यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### ग्रामविकास व जलसंधारण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ मे १९९९

...ष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१.

...ांक सेप्रप. ११९४/सीआर-१५१२/९३.—महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम ५) याच्या कलम २७४, पोट-कलम (२), खंड (एकोणचाळीस) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि त्या बाबतीत महाराष्ट्र शासनाला समर्थ करणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा सेवाप्रवेशोत्तर परीक्षा नियम, १९८५ मध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त कलम २७४ च्या पोट-कलम (३) ...रे आवश्यक असल्याप्रमाणे आधुनी प्रसिद्ध करण्यात आले होते.

१. या नियमांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा सेवाप्रवेशोत्तर परीक्षा (सुधार...) नियम, १९९९ असे म्हणता येईल.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा सेवाप्रवेशोत्तर परीक्षा नियम, १९८५ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "मुख्य नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम ८ च्या उप-नियम (३) मधील खंड (ब) वगळण्यात यावा.

३. मुख्य नियमांच्या नियम ५ मधील सध्याचा उप-नियम (३) ऐवजी पुढील उप नियम दाखल करण्यात यावा :—

"(३) परिषद कर्मचारी नियम ४ मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये व संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्याच्या आधी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या त्या पदाच्या संवर्गातील सर्व परिषद कर्मचाऱ्यांबरोबरची त्याची ज्येष्ठता त्याला गमवावी लागेल आणि अशा ज्या परिषद कर्मचाऱ्यानंतरचा ज्येष्ठताक्रम त्याला देण्यात येईल त्या परिषद कर्मचाऱ्यांना ज्येष्ठ असणारे आणि त्याच्या नंतर परंतु नियम ४ मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये व संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणारे कर्मचारी त्याला ज्येष्ठ असतील".

४. मुख्य नियमांच्या नियम ६ मध्ये उप-नियम (२) मधील सध्याचा खंड (७ वगळण्यात यावा.

५. मुख्य नियमांच्या नियम ६ नंतर पुढील नियम दाखल करण्यात यावा :—

"६अ. परीक्षेला बसण्यासाठी संधी.—नियम ५ च्या तरतुदीस अधीन राहून परिषद कर्मचाऱ्याला परीक्षेस बसण्यासाठी कितीही वेळा संधी मिळू शकेल".

६. मुख्य नियमांच्या नियम ७ मधील "किंवा इंग्रजी" हा मजकूर वगळण्यात या

७. मुख्य नियमांच्या नियम ९ मध्ये—

(अ) सध्याचे उप-नियम (१) ऐवजी पुढील उप-नियम दाखल करण्यात य —

"(१) परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण गुणांच्या ४ टक्के गुण आवश्यक असतील".

(ब) उप-नियम (३) मधील "किंवा त्याने एकूण गुणांच्या ५० टक्के किंवा अधिक गुण मिळविले असतील परंतु एका विषयात तो २५ टक्के गुण मिळवू श नसेल" हा मजकूर वगळण्यात यावा.

८. मुख्य नियमांस जोडलेल्या परिशिष्ट "अ" मध्ये—

(अ) सध्याचे नोंद-क्रमांक (एक) व (दोन) ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्या यावा :—

"(एक) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-तीन) (कृषि)

(दोन) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-तीन) (पशुसंवर्धन) द्वितीय व तृतीय श्रे"

(ब) सध्याचे नोंद-क्रमांक (चार), (पाच), (अकरा) व (पंधरा) हा मजकूर वगळण्यात यावा.

(क) सध्याचे नोंद क्रमांक (बारा) ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा :—

"(बारा) जिल्हा सेवा (वर्ग-तीन) (दुग्ध पशुसंवर्धन) प्रथम व द्वितीय श्रेणी.'

९. मुख्य नियमांस जोडलेल्या परिशिष्ट "ब" च्या खालील तक्त्यामध्ये "दोन (पुस्तकसंग्रह)" या नोंदीसमोर "भाग २ मध्ये" शिर्ष या शीर्षाखालील उप नोंद "(चार)

महाराष्ट्र जिल्हा परिषद सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम, १९६६" या ऐवजी पुढील उप नोंद दाखल करण्यात यावी :—

"(चार) महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम.".

१०. मुख्य नियमांस जोडलेल्या परिशिष्ट "क" मधील अर्जाच्या नमुन्यामधील नोंद क्रमांक ७ हा मजकूर वगळण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**चि. चं. पाटील,**
शासनाचे उप सचिव.

---

टीप.—महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा सेवाप्रवेशोत्तर परीक्षा नियम, १९८५ यात यापूर्वी **महाराष्ट्र शासन राजपत्र,** असाधारण, भाग चार-ब मध्ये दिनांक १ एप्रिल १९९२ च्या मराठी पृ. ६०० वर प्रसिद्ध झालेली शासन अधिसूचना क्रमांक सेप्रप. ११९१/सीआर-१०४/१९/१३, दिनांक १ एप्रिल १९९२ अन्वये शेवटी सुधारणा करण्यात आली होती.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा सेवाप्रवेशोत्तर परीक्षा नियम, १९८५ यातील ही १९९९ मधील पहिली सुधारणा आहे.

# RURAL DEVELOPMENT AND WATER CONSERVATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 24th May 1999

MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

No. SEPRAPA. 1194/CR-1512/13.—In exercise of the powers conferred by clause (*xxxix*) of sub-section (*2*) of section 274 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayats Samites Act, 1961 (Mah. V of 1962) and all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Zilla Parishads, District Services Post Recruitment Examination Rules, 1985, the same having been previously published as required by sub-section (*3*) of the said section 274, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Zilla Parishads District Service Post Recruitment Examination (Amendment) Rules, 1999.

2. In rule 4 of the Maharashtra Zilla Parishads District Services Post Recruitment Examination Rules, 1985 (hereinafter referred to as "the principal rules"), in sub-rule (*3*), clause (*b*) shall be deleted.

3. In rule 5 of the principal rules, for sub-rule (*3*), the following rule shall be substituted, namely :—

"(3) A Parishad employee who fails to pass the examination within the period and chances specified in rule 4, shall loose the seniority in the cadre of his post to all those Parishad Employees in the said post who pass the examination before him and also to all those who are senior to such Parishad Employees, below whom he is placed, and who may pass the examination after him but within the period specified in rule 4".

4. In rule 6 of the principal rules, in sub-rule (*2*), clause (*a*) shall be deleted.

5. After rule 6 of the principal rules, the following rule shall be inserted, namely :—

"6A. *Chances for appearing for Examination.*—Subject to the provisions of rule 5, a Parishad Employee may avail of any number of chances for appearing at the examination.".

6. In rule 7 of the principal rules, the words " or English " shall be deleted.

7. In rule 9 of the principal rules,—

(*a*) for sub-rule (*1*), the following sub-rule shall be substituted, namely :—

"(1) The standard for passing the Examination shall be 40 per cent marks is each paper.".

(*b*) in sub-rule (*3*), the words and figures " or who has obtained 50 per cent or more of the total marks but not able to obtain 35 per cent marks in one paper, " shall be deleted.

8. In Appendix "A" appended to the principal rules,—

(a) for entries (i) and (ii) the following entries shall be substituted, namely :—

"(i) District Technical Service (Class-III) (Agriculture),

(ii) District Technical Service (Class-III) (Animal Husbandry), Grade-II and III ;".

(b) entires (iv), (v), (xi) and (xv) shall be deleted.

(c) for entry (xii), the following etury shall be substituted, namely :—

"(xii) District Service (Class-III) (Subordinate Animal Husbandry) Grade I and II ;".

9. In Appedix "B" appended to the principal rules, in column 1 against entry "II (with books)", in column (2), under the heading "Subject", for sub-entry (iv) regarding "The Maharashtra Zilla Parishad General Provident Fund Rules, 1966" the following sub-entry shall be substituted, namely :—

"(iv) The Maharashtra General Provident Fund Rules".

10. In Appendix "C" appended to the principal rules, in the form of application, entry 7 shall be deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

C. C. PATIL,
Deputy Secretary to Government.

Note.—The Maharashtra Zilla Parishad, District Services, Post Recruitments, Rules, 1985 were last amended by Government Notification, No. SEPRAPA. 1191/CR-114/91/13, dated 1st April 1992 published at page 600 of the *Maharashtra Government Gazette*, Extra Ordinary, Part IV-B, dated 1st April 1992.

This is the first amendment in the year 1999 to the Maharashtra Zilla Parishads District Services, Post Recruitments.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

**जिल्हा परिषद, कर्मचाऱ्यांसाठी लागू करण्यात आलेली सेवा प्रवेशोत्तर परिक्षेबाबत वर्षनिहाय घेण्यात आलेल्या तारखा व विभागीय आयुक्त यांचेकडून निकाल जाहिर केल्याच्या तारखेबाबतचा तपशिल.**

(दिनांक ३०.४. २०१० अखेर)

| अ.क्र. | परिक्षेचे वर्ष | प्रत्यक्ष परिक्षा घेतल्याचा दिनांक | विभागीय आयुक्त कार्यालयाकडून निकाल जाहिर केल्याचा दिनांक | शेरा. |
|---|---|---|---|---|
| १ | १९९० | दि.१३ व १४ ऑक्टोंबर १९९० | पत्र क्र. १३९६ दि. १.१२.१९९० | I |
| २ | १९९१ | माहे ऑक्टोंबर १९९१ | निकालपत्र संचिकेत उपलब्ध नाही. | |
| ३ | १९९२ | दि.१४ व १५ नोव्हेंबर १९९२ | पत्र क्र. १००दि. २३.२.१९९३ | 2 |
| ४ | १९९३ | दि.२७ व २८ नोव्हेंबर १९९३ | पत्र क्र. १०३ दि. २१.५.१९९४ | 3 |
| ५ | १९९४ | दि.१८ व १९ डिसेंबर १९९४ | पत्र क्र. २७२ दि. २४.११.१९९५ | |
| ६ | १९९५ | दि. ४ व ५ डिसेंबर १९९५ | पत्र क्र. ११४ दि. २४.१०.१९९६ | |
| ७ | १९९६ | दि.४ व ५डिसेंबर १९९६ | पत्र क्र. १४२७ दि.१८.१०.१९९७ | |
| ८ | १९९७ | दि. १३ व १४ डिसेंबर १९९७ | पत्र क्र. २९३४ दि. ११.०९.१९९८ | |
| ९ | १९९८ | दि.२६ व २७ डिसेंबर १९९८ | पत्र क्र. २५८५ दि. ३०.९.१९९९ | |
| १० | १९९९ | दि.११ व १२ डिसेंबर १९९९ | पत्र क्र. ११९९ दि. १७.५.२००० | |
| ११ | २००० | दि.९ व १० डिसेंबर २००० | पत्र क्र. ३२३४ दि. २३.११.२००१ | |
| १२ | २००१ | दि.२२ व २३ डिसेंबर २००१ | पत्र क्र. ३०९२ दि. ९. १२.२००२ | |
| १३ | २००२ | दि.२८ व २९ डिसेंबर २००२ | पत्र क्र. ३११५ दि. २६.९.२००३ | |
| १४ | २००३ | दि.२७ व २८ डिसेंबर २००३ | पत्र क्र. २१३६ दि. २२.६.२००४ | |
| १५ | २००४ | दि.२५ व २६ डिसेंबर २००४ | पत्र क्र. १५६० दि. ३०.७.२००५ | |
| १६ | २००५ | दि. २४ व २५ डिसेंबर २००५ | पत्र क्र.२०६३ दि. १५.०९.२००६ | |
| १७ | २००६ | दि. २३ व २४ डिसेंबर २००६ | पत्र क्र.२५५८दि. २४.१०.२००७ | |
| १८ | २००७ | दि.२२ व २३ डिसेंबर २००७ | पत्र क्र.७००३ दि. २६.११.२००८ | |
| १९ | २००८ | दि. २७ व २८ डिसेंबर २००८ | पत्र क्र. १२३८ दि. ७.११.२००९ | |
| २० | २००९ | दि. २६ व २७ डिसेंबर २००९ | निकाल जाहीर करावयाचा आहे. | |